महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
स्पायसर मेमोरिअल कॉलेज समोर, औंध, पुणे -४११ ०६७.
Fax No. : 020-25690489;
E-mail : cah.estt.gazetted@gmail.com
Telephones: 020-25690480;
25690481; 25690485. Extn.203

प्रति,

१. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व)
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला
३. सहआयुक्त पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, औंध, पुणे-७
४. सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे-७
५. प्राचार्य राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र, गोखलेनगर, पुणे-१६
६. उपआयुक्त पशुसंवर्धन (गुण नियंत्रण), आरे कॉलनी, गोरेगाव मुंबई
७. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (सांख्यिकी), पुणे-६७

**विषय : पशुसंवर्धन विभागातील पदांबाबतची माहिती वेबसाईटवर प्रसिद्ध करणेबाबत...**

संदर्भ :१. शासन पत्र क्र.पसंप्र-२०१८/संकीर्ण/पदुम-१, मंत्रालय, मुंबई-३२, दि.२०.११.२०१८
२. खात्याचे पत्र क्र.पविअ-१/प्र.क्र.संकीर्ण/सद्यस्थिती/२७३९/२०१८, पसं-२, औंध, पुणे-६७, दि.१२.१२.२०१८

**जा.क्र.पविअ-१/प्र.क्र.संकीर्ण/सद्यस्थिती/ २९० /२०१८, पसं-२, औंध, पुणे-६७, दि. २९.१२.२०१८**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भीय क्र.२ च्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार अधिनस्त कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या माहितीद्वारे माहे नोव्हेंबर, २०१८ चा पशुधन विकास अधिकारी (गट-अ/ब) यांचा अंतिम सद्यस्थिती अहवाल तसेच उपआयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) यांचा माहे नोव्हेंबर, २०१८ अखेरचा सद्यस्थिती अहवाल संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे.

तरी, यापुढे वरील गट-अ/ब संवर्गातील ज्या अधिकाऱ्यांच्या माहितीमध्ये दुरुस्त्या/बदल झालेले असतील त्यांचीच माहिती संदर्भीय क्र.२ च्या पत्रान्वये यापूर्वी कळविण्यात आलेल्या तक्त्यात खात्यास दरमहा ३० तारखेस सायं.४ वाजेपर्यंत सादर करावी. तसेच उर्वरित गट-अ/ब संवर्गातील अधिकाऱ्यांचाही सद्यस्थिती अहवाल यापुढे दरमहा सादर करण्यात यावा.

सोबत : सर्वसाधारण सूचना

सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय)
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
औंध, पुणे-६७

## पशुसंवर्धन विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या गट-अ/ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सद्यस्थिती अहवालाबाबत सर्वसाधारण सूचना

१. पशुधन विकास अधिकारी यांच्या प्राप्त माहितीमध्ये बरेचसे रकाने भरलेले नाहीत, तरी, सदर रकाने परिपूर्ण भरणेबाबत कार्यवाही करावी.

२. ज्या पशुधन विकास अधिकारी यांचे पूर्ण नाव नमूद केलेले नाहीत, त्यांची पूर्ण नावे कळविण्यात यावीत.

३. प्रतिनियुक्तीची पदे त्या-त्या जिल्ह्यात/विभागात समाविष्ट करणेबाबत सूचना दिल्या होत्या, परंतु, तसे केल्याचे दिसून येत नाही. त्याबाबत पुनःश्च खात्री करावी.

४. रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार कोणाकडे व केव्हापासून देण्यात आला आहे. याबाबत परिपूर्ण माहिती सादर करावी.

५. जिल्ह्यातील/विभागातील सर्व पदांचा समावेश केला आहे किंवा नाही ? याबाबत खात्री करावी व अचूक माहिती सादर केल्याचे प्रमाणपत्र सोबत सादर करावे.

६. कार्यालयाचे पूर्ण नाव, तालुका व जिल्हा नमूद करावा.

७. लातूर विभागाने रकाना क्र.८ मध्ये "जिल्ह्यात केव्हापासून " ची माहिती ऐवजी सेवातपशील दिला आहे तरी, संबंधित अधिकारी "जिल्ह्यात केव्हापासून" ची माहिती देण्यात यावी.

८. त्यानंतर आपणांकडून दरमहा ३० तारखेस स्टाफ पोझीशनसाठी खात्यास माहिती सादर करताना, संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या अचूक यादीतील कार्यालयाच्या अनुक्रमांका नुसारच माहिती सादर करावी.

९. ज्या विभागांनी सहाय्यक प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा या पदांचा समावेश केला नाही, ती पदे समाविष्ट करण्यात आली असून सदर पदावर कार्यरत अधिकाऱ्यांची माहिती डिसेंबर २०१८ च्या सद्यस्थिती अहवालामध्ये समाविष्ट करण्यात यावी.